औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या बुधवार दिनांक २९.५.९१ रोजी झालेल्या ६२ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

---

सभेत खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१] मा. श्री. ईश्वरराव भोसीकर — सभापती औरंगाबाद मंडळ
२] मा. श्री. अरविंद महाजन — उपसभापती औरंगाबाद मंडळ
३] मा. श्री. गिरीश गोखले, विभागीय आयुक्त, नासिक. — सदस्य

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद/नासिक, उपसंचालक नगररचना औरंगाबाद विभाग हे पूर्वसूचनेनुसार अनुपस्थित होते.

विषय क्र. १:

दिनांक २९.४.९१ रोजी झालेल्या ६१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ३७१

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने दिनांक २९.४.९१ रोजी झालेल्या ६१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: गट क्र. १०४/१ तीसगांव येथील उच्च उत्पन्न गटातील ४१ गाळ्यांची योजना.

२४ गाळे व १७ गाळे अशा दोन विभागात कार्यान्वीत करण्याबाबत.

. . . .

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतीनी मंडळास माहिती दिली की, औरंगाबाद मंडळाला वाळूज विशेष नियोजन प्राधिकरण या क्षेत्रान्तर्गत तीसगांव येथील गट नं. १०४/१ या १०.२५ हे. सरकारी जमिनीचा ताबा मिळाला आहे. सदर जमिनीवरील अल्प उत्पन्न गट ५७८ गाळे, मध्यम उत्पन्न गट २०० गाळे उच्च उत्पन्न गट ४१ गाळे व्यापारी भूखंड १, प्राथमिक शाळेकरिता १ भूखंड अशा योजनेस प्राधिकरणाने दिनांक १५.१२.९० च्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता दिली.

जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालयातर्फे सदर जमिनीतील काही भाग अंदाजे ४ एकर १०४/२ यामध्ये दाखविण्यात आल्यामुळे गट नं. १०४/२ या जमिनीचे मालक श्री.जसपालसिंग व मनमोहनसिंग यांनी प्रत्येकी १ दावा दाखल करून न्यायालयीन स्थगिती मिळविली आहे. त्यामुळे सदर उच्च उत्पन्न गटातील ४१ गाळ्यापैकी फक्त २४ गाळ्यांची योजना कार्यान्वीत करता येईल असे उपसभापतींनी सांगितले. कार्यान्वीत करता येऊ शकणा-या २४ गाळ्याकरिता स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. जाहिरातीस अनुसरून ६३ अर्ज (गाळ्याच्या किंमतीच्या १०% अनामत रकमेसह प्राप्त झालेले आहेत.

या अनुषंगाने मंडळाच्या सदस्यांनी अशी सूचना केली की, मंडळास मिळालेल्या तीसगांव येथील शासकीय जमिनीची संयुक्त मोजणी नकाशा [जॉईंट मेजरमेंट प्लॅन] व सदर जमिनीचे तथाकथित मालक यांना देण्यात आलेला नकाशा यातील तफावतीबद्दल जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे माहिती द्यावी.

ठराव क्र. ३७२

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने सर्वानुमते असा निर्णय घेतला की, गट क्र. १०४/१ तीसगांव येथील उच्च उत्पन्न गटातील ४१ गाळ्यांची योजना जमिनीच्या काही भागावर न्यायालयीन स्थगिती आदेश असल्यामुळे २४ गाळे व १७ गाळे अशा दोन विभागात कार्यान्वीत करावी.

तसेच मंडळाच्या सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे तीसगांव येथील मंडळाला मिळालेल्या शासकीय जमिनीबाबत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना पत्र लिहून संयुक्त मोजणी नकाशातील तफावतीबद्दल विचारणा करावी.

विषय क्र.३: औरंगाबाद मंडळाच्या सदस्यांनी जळगांव येथील भेटीकरिता केलेल्या खर्चाची परिपूर्ती करणेबाबत.

ठराव क्र.३७३

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, औरंगाबाद मंडळाचे सदस्य श्री.गोडघाटे व श्री.मुन्नीलाल गौतम हे जमिन संपादनाबाबत जिल्हाधिकारी/जळगांव यांच्याशी चर्चा करण्याकरिता त्यांच्या दौ-याच्या खर्चास [ साधारणपणे रु. ७५०/-] मंडळ मान्यता देत आहे. दौ-यासंबंधीची व जमिन संपादनाच्या अनुषंगाने काय प्रगती झाली याचा अहवाल त्यांनी मंडळास द्यावा.

विषय क्रमांक:४

लातूर येथील गाळे वितरणाबाबत.

ठराव क्र.३७४

या विषयावर मंडळाच्या सदस्यांनी सविस्तर चर्चा केली व चर्चेअंती मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतले व त्या अनुषंगाने कार्यवाही करावी असे ठरले.

१] लातूर येथील अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट भूखंड यामध्ये जर स्सी/एसटी या प्रवर्गासाठी गाळे आरक्षीत असतील तर ते सर्वसाधारण जनतेसाठी वर्ग करण्याविषयी शासनाकडे/प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवून कार्यवाही करावी.

२] सर्वसाधारण जनतेची गाळ्यांच्या सुरुवातीस भरावयाची रक्कम भरण्याची क्षमता नसल्यास यावर उपाय म्हणून प्रत्येक गाळेधारकास व्यक्तीशः बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी गाळा दुय्यम-बांद गहाण ठेवणेच्या शक्यतेबाबत प्रकरण उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे पातळीवर विचारार्थ ठेवणे.

३] सदर अवितरीत गाळे भाडेतत्वावर वितरीत करण्याची शक्यता तपासून पाहणे किंवा लिव्ह लायसेंस तत्वावर देण्याची शक्यता प्राधिकरणाच्या पातळीवर पत्रव्यवहार करुन तपासून पहाणे.

४] मोठ्या प्रमाणावर जाहिरात करून तसेच खूप प्रयत्न करूनही एससी/एसटी या आरक्षीत गटाच्या अवितरीत गाळ्यांच्या विलंबामुळे मंडळास होणाऱ्या आवर्ती [रिकरींग] व्याजाच्या तोटयाचा विचार करून फेब्रुवारी ९० पासूनचे थकीत हप्ते ५ समान हप्त्यात घेऊन तो प्रत्येक हप्ता दर दोन महिन्यानी वसुल करण्याची शक्यता तपासून पहाणे.

विषय क्र.५: मा.सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

: आयत्यावेळेचा विषय नसल्याने बैठकीनंतर मा.सभापतीचे आभार मानून सभा संपली.

. . . . .